# ‘‘डिजीटल पेमेंटस्’’ मार्गदर्शिका

## विविध प्रकारच्या पेमेंटस् पद्धतींसाठीचे क्रमवार मार्गदर्शन

### कार्डस्, यु.एस.एस.डी., ए.ई.पी.एस., यु.पी.आय, वॉलेट्स

यशदा

मूळ इंग्रजी मार्गदर्शिकेचे मराठी भाषांतर, तसेच महाराष्ट्र राज्य स्तरावरील सर्व संबधितांना मराठीतून प्रशिक्षणाचे नियोजन **यशदा, पुणे - ४११ ००७**, येथील **राज्य ग्रामीण विकास संस्था** (SIRD), तसेच **माहिती तंत्रज्ञान केंद्र** (CIT), या विभागांमार्फत करण्यात आले आहे.

# बँकेची कार्डस्

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# बँक कार्ड प्राप्त करणे आणि ते कार्यान्वित करणे

## 1 आपल्या बँक खात्यातून कार्ड कसे प्राप्त करून घ्यावे?

आपल्या बँकेच्या जवळच्या शाखेस भेट द्या आणि विहित नमुन्यात अर्ज करा.

एका खात्याकरिता एकाहून अधिक कार्डस् प्राप्त करून घेऊ शकता.
बँकेकडून कार्डचा "पिन" क्रमांक वेगळा पुरवण्यात येतो.

## 2 आपले कार्ड कार्यान्वित कसे करावे?

आपल्या बँकेच्या ए.टी.एम. मधून आपल्या खात्याची शिल्लक तपासून कार्ड कार्यान्वित करता येते.

आपल्या बँकेच्या शाखेतून कोणताही एक व्यवहार करूनदेखील आपले कार्ड कार्यान्वित करता येते.

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# कार्डांचे विविध प्रकार आणि त्यांचा वापर

## प्रीपेड कार्ड

आपल्या बँकेच्या खात्यात आधी रक्कम भरून कार्यान्वित केले जाते

हे कार्ड वापरण्यास सुरक्षित असते.
या कार्डद्वारे होणा-या व्यवहारांवर आणि त्यातील रकमेवर मर्यादा असतात.

आपण मोबाईल रिचार्ज करतो, त्याच पद्धतीने हे कार्ड रिचार्ज करता येते.

## डेबिट कार्ड

आपल्या बँक खात्याशी संलग्न असते (जोडलेले असते)

विविध दुकानांतील खरेदी, ए.टी.एम. मधील व्यवहार, वॉलेट, मायक्रो ए.टी.एम., ऑनलाईन खरेदी, इत्यादी अनेक ठिकाणी व विविध उद्देशांकारिता वापरता येते.

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# “पॉईंट ऑफ सेल” (पी.ओ.एस.) आणि कार्डस्‌विषयी

| सर्व बँका त्यांच्या खातेदारांना विविध प्रकारची कार्डस पुरवितात | विविध प्रकारची खरेदी करताना आपली कार्डस वापरा | आपल्या बँकेकडून आपल्या खात्यातून किंवा रोख रकमेद्वारे प्री-पेड कार्डस मिळवता येतात |
| --- | --- | --- |
| प्री-पेड कार्डस | कोणत्याही पी.ओ.एस. वर | प्री-पेड (आधी रक्कम भरलेले) कार्ड |
| डेबिट कार्डस | ए.टी.एम. यंत्रांमध्ये | ही कार्डस रोख रकमेसारखीच असतात |
| क्रेडिट कार्डस | ऑनलाइन खरेदी करताना | अनेक वेळा, पुन्हा-पुन्हा रि-चार्ज करता येतात |
| | | पी.ओ.एस. व ए.टी.एम. मध्ये वापरता येतात |

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# “अनस्ट्रक्चर्ड सप्लिमेंटरी सर्व्हिस डेटा” (यु.एस.एस.डी.) वर आधारित मोबाईल बँकिंग

*99# - राष्ट्रीय स्तरावरील एकत्रित यु.एस.एस.डी. प्लॅटफॉर्म (एन.यु.यु.पी.)

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# सुविधा कार्यान्वित करण्याकरिता कशाची आवश्यकता असते?

1. कोणत्याही बँकेत खाते असावे लागते
2. आपल्याकडे कोणत्याही एका प्रकारचा मोबाईल असावा लागतो

प्रति दिवशी प्रति ग्राहक रु.५,०००/- पर्यंतच्या पेमेंटसाठी वापरता येते.

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# नोंदणी कशी करावी?


1. आपला मोबाईल नंबर आपल्या बँक खात्याशी जोडण्याकरिता (“लिंक” करण्याकरिता) आपल्या बँकेच्या शाखेला भेट द्या.
(ही प्रक्रिया ए.टी.एम. यंत्रातून किंवा ऑनलाइनसुद्धा करता येते)

2. नोंदणी झाल्यानंतर आपल्याला आपला “मोबाईल मनी आयडेंटिफायर” (एम.एम.आय.डी.) आणि “मोबाईल पिन” (एम.पिन) मिळेल

3. आपला एम.एम.आय.डी आणि एम.पिन लक्षात ठेवा, तसेच तो अन्य कोणास सांगू नका.


या प्रणालीचा वापर अधिकाधिक सुलभ होण्याच्या दिशेने काही नवे बदल करण्यात येत आहेत. हे बदल पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर वेगळ्या एम.एम.आय.डी. ची आवश्यकता भासणार नाही.

# अन्य बँकेच्या खात्यात रक्कम वर्ग करणे





**वर दाखवलेल्या प्रत्येक स्क्रीनच्या सविस्तर वर्णनाकरिता पुढील पृष्ठ पहा.....**

# अन्य बँकेच्या खात्यात रक्कम वर्ग करणे




1

आपल्या फोनवरून *99# या क्रमांकावर फोन करा





2

या स्क्रीनवर बँकेच्या नावाची ३ अक्षरे किंवा आय.एफ.एस.सी. कोडची पहिली ४ अक्षरे टाईप करा




3

या स्क्रीनवर आपल्याला विविध पर्याय उपलब्ध झालेले दिसतील. आपल्या सध्याच्या उदाहरणात आपण क्रमांक ४ चा पर्याय निवडणार आहोत.




4

ज्या व्यक्तीला आपण पैसे पाठवत आहोत, त्याचा मोबाईल क्रमांक आपल्याला या स्क्रीनवर टाईप करावा लागेल.

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# अन्य बँकेच्या खात्यात रक्कम वर्ग करणे

Enter Beneficiary MMID

9240378

5

ज्या व्यक्तीला आपण पैसे पाठवत आहोत, त्याचा एम.एम.आय.डी. आपल्याला या स्क्रीनवर टाईप करावा लागेल.

Enter Amount & remarks (optional) separated with single space

AS [Amount] [Remarks]

500 rent

6

आपल्याला या स्क्रीनवर आपण वर्ग करत असलेली रक्कम आणि काही संक्षिप्त तपशील (असल्यास) टाईप करावा लागेल.

Want to transfer Rs 500 to beneficiary with Mobile 9911330092 and MMID 9002567 For rent [Enter Your M-Pin] [Last 4-digits of account number] separated with single space

1234 4567

7

या स्क्रीनवर आपल्याला आपला स्वत:चा एम.-पिन आणि आपल्या बँक खाते क्रमांकाचे शेवटचे चार अंक टाईप करावे लागतील.

Your a/c no. xxxxxxx4567 is debited for Rs. 500.00 on 16-02-2014 and a/c linked to mobile 9911330092 credited (IMPS Ref no 212233445555)

8

हा संपूर्ण व्यवहार यशस्वी झाला असल्यास या स्क्रीनवर आपल्याला तसा संदेश आणि सदर व्यवहाराचा संदर्भ क्रमांक दिसू लागेल. (हा संदर्भ क्रमांक पुढील संदर्भाकरिता नोंद करून ठेवणे हितावह असेल)

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# “आधार”क्रमांकाशी संलग्न पेमेंट प्रणाली (ए.ई.पी.एस.)

# “आधार” क्रमांकाशी संलग्न पेमेंट प्रणाली (ए.ई.पी.एस.)

ए.ई.पी.एस. च्या माध्यमातून बँकेच्या कारभार संपर्क एजंटच्या सहाय्याने “पी.ओ.एस.” (मायक्रो ए.टी.एम.) मधून एका बँकेतून दुस-या बँकेत व्यवहार करता येतात.


सदर प्रक्रियेसाठी केवळ आपला “आधार” क्रमांक असणे आवश्यक आहे.

"आधार”च्या माध्यमातून मिळवता येणा-या सेवा :-

- खात्यातील शिल्लक जाणून घेणे
- रक्कम जमा करणे
- रक्कम काढणे
- एका आधार क्रमांकाकडून दुस-या आधार क्रमांकावर रक्कम पाठवणे / वर्ग करणे

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# ए.ई.पी.एस. व्यवहारातील महत्वाचे टप्पे




राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# ए.ई.पी.एस. व्यवहारातील महत्वाचे टप्पे

आपल्या बँकेच्या शाखेत जाऊन किंवा बँकेच्या कारभार संपर्क एजंटच्या सहाय्याने आपले बँक खाते आपल्या “आधार” क्रमांकाशी जोडून घ्या.


त्यानंतर तुम्ही ए.ई.पी.एस. केंद्रांवर, मायक्रो ए.टी.एम.केंद्रांवर, कोणत्याही पिन किंवा पासवर्डशिवाय विविध प्रकारचे व्यवहार करू शकता

या माध्यमातून मिळवता येणा-या सेवा :-

- खात्यातील शिल्लक जाणून घेणे
- रक्कम जमा करणे
- रक्कम काढणे
- एका आधार क्रमांकाकडून दुस-या आधार क्रमांकावर रक्कम पाठवणे / वर्ग करणे
- रास्त दर दुकानांतून खरेदी करणे

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# मायक्रो ए.टी.एम. वरील व्यवहार






राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# यु.पी.आय.
# (युनिफाईड पेमेंट इंटरफेस)

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# यु.पी.आय. मध्ये नोंदणी करण्यासाठी आवश्यक बाबी

## आवश्यक बाबी

इंटरनेटची जोडणी असणारा स्मार्टफोन


बँक खात्याचा तपशील (केवळ नोंदणीकरिता)

## उपलब्ध ॲप्स (२८ बँकांची ॲप्स)

स्टेट बँक ऑफ इंडियाचे ॲप, पंजाब नॅशनल बँकेचे यु.पी.आय., आय.सी.आय.सी.आय. बँकेचे "यु.पी.आय. कलेक्ट", अक्सीस पे, कॅनरा बँकेचे यु.पी.आय., युनायटेड कमर्शियल बँकेचे यु.पी.आय., युनियन बँकेचे यु.पी.आय., ओरियेंटल बँक ऑफ कॉमर्स बँकेचे यु.पी.आय., तसेच इतर २० बँकांकडील विविध सुविधा


राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.


# यु.पी.आय. मध्ये नोंदणी करण्याची प्रक्रिया




राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.


# यु.पी.आय. मध्ये नव्याने नोंदणी करणे







# यु.पी.आय. द्वारे रक्कम पाठवणे / वर्ग करणे





राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# रक्कम पाठवणे / वर्ग करणे




# यु.पी.आय. द्वारे रक्कम प्राप्त करणे / रकमेची मागणी करणे




राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# रक्कम प्राप्त करून घेणे




राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# वॉलेटस्

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# “ई-वॉलेट्स” म्हणजे काय?

इलेक्ट्रॉनिक प्री-पेड पेमेंट प्रणाली (मोबाईल असणे आवश्यक)

संगणकाचा अथवा मोबाईलचा वापर करून विविध प्रकारची ऑनलाईन खरेदी करण्याकरिता याचा वापर करता येतो.

डिजीटल वॉलेटमध्ये (ई-वॉलेटमध्ये) रक्कम जमा करण्याकरिता आपले बँक खाते डिजीटल वॉलेटला (ई-वॉलेटला) जोडलेले असणे आवश्यक आहे.

बहुतेक सर्व बँका, तसेच काही खाजगी कंपन्या ई-वॉलेटची सेवा पुरवतात.

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# ई-वॉलेट्सचा वापर करणे

**ग्राहकासाठी ई-वॉलेट वापराची मर्यादा :- सर्वांसाठी महिना रु.२०,०००/-. के.वाय.सी. कागदपत्रे सादर केली असल्यास महिना रु.१ लाख**

ग्राहक : मोबाईलमध्ये ॲप डाऊनलोड करून इंस्टाल करा → मोबाईलचा उपयोग करून नोंदणी करा → क्रेडिट / डेबिट कार्ड किंवा नेट बँकिंगद्वारे पैसे जमा करा → वॉलेटद्वारे पेमेंट करणे सुरु करा

**व्यापा-यासाठी ई-वॉलेट वापराची मर्यादा :- स्वयं-घोषणेसह महिना रु.५०,०००/-. के.वाय.सी. कागदपत्रे सादर केली असल्यास महिना रु.१ लाख**

व्यापारी / सेवा दाता : मोबाईलमध्ये ॲप डाऊनलोड करून इंस्टाल करा → मोबाईलचा उपयोग करून नोंदणी करा → व्यापारी असल्याची स्वयं-घोषणा करा → वॉलेटद्वारे पेमेंट स्विकारणे सुरु करा

ई-वॉलेट वापराकरिता किमान आवश्यक :- बँक खाते, स्मार्टफोन, 2G/3G इंटरनेट पॅक, कोणतेही एक विनामुल्य वॉलेट ॲप

**राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.**

# विक्री केंद्रे
# (“पॉईंट ऑफ सेल”)
# (“पी.ओ.एस.”)

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# पी.ओ.एस. चे विविध प्रकार



यंत्राच्या स्वरूपातील पी.ओ.एस.

यंत्रावरील खाचेमधून कार्ड फिरवणे.

लँडलाईन टेलिफोनची जोडणी किंवा सिम कार्ड, तसेच जी.पी.आर.एस. असणे आवश्यक



एम.-पी.ओ.एस.

पी.ओ.एस. यंत्राला आपला फोन वायरद्वारे अथवा ब्ल्यू-टूथ द्वारे जोडलेला असणे आवश्यक



व्ही.-पी.ओ.एस.

आभासी ई-पेमेंट गेट-वे

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# यंत्राच्या स्वरूपातील पी.ओ.एस.

1. पी.ओ.एस. यंत्रावरील खाचेतून डेबिट कार्ड / क्रेडिट कार्ड फिरवा.
2. देय असलेली रक्कम टाईप करा, तसेच कार्डाचा पिन क्रमांक टाईप करा.
3. छापील स्वरूपातील पावती मिळवा.








# नवे पी.ओ.एस. यंत्र प्रस्थापित करणे

1. विविध प्रकारच्या व्यवहारांसाठी एक चालू खाते उघडावे आणि त्याचा खाते क्रमांक नोंदवावा.

2. विहित नमुन्यातील अर्ज भरावा (ऑनलाईन, किंवा बँकेच्या शाखेमध्ये जाऊन)

3. कोणत्या प्रकारचे पी.ओ.एस. यंत्र हवे आहे, त्याचा प्रकार निवडावा (लँडलाईन किंवा जी.पी.आर.एस.)

4. निम्नोल्लेखीत कागदपत्रे सादर करावीत:
   - व्यवसायाचा पुरावा (कोणताही एक)
     - शॉप अॅक्ट नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
     - व्हॅट प्रमाणपत्राची प्रत
     - विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
   - रहिवासाचा (पत्त्याचा) पुरावा
   - मालकाच्या / भागीदाराच्या ओळखपत्राचा पुरावा
   - आर्थिक विवरणे
     - बँक खात्याचे विवरण (स्टेटमेंट)
     - नजीकच्या वर्षातील आयकर विवरणपत्र

5. बँकेच्या “मर्चंट डिस्काऊंट रेट” (एम.डी.आर) ला स्वीकृती द्यावी

6. विक्रेता / व्यापारी आणि बँक, या दोहोंमधल्या विहित नमुन्यातील करारावर स्वाक्षरी करावी आणि तो सादर करावा

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# मोबाईल पी.ओ.एस.




टीप :- एम.पी.ओ.एस. चे प्रात्यक्षिक दाखवण्याकरिता या उदाहरणामध्ये "एम.स्वीप" चा वापर करण्यात आला आहे.

राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.

# व्हर्च्युअल पी.ओ.एस. (व्ही-पी.ओ.एस.)

पी.ओ.एस. मशीनची आवश्यकता नाही.

व्यापा-याच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याकरिता / वर्ग करण्याकरिता क्यू.आर. कोडचा वापर केला जातो.

व्यापा-याच्या बँक खात्याची संपूर्ण गोपनीयता (त्याच्या बँक खात्याचा तपशील इतरांना समजत नाही)



# अवश्य कराव्यात अश्या काही बाबी

तुमच्या बँक खात्यातील प्रत्येक व्यवहाराची सूचना एस.एम.एस. द्वारे नियमितपणे मिळवण्यासाठी तुमचा मोबाईल क्रमांक बँकेकडे नोंदवा.

तुमच्या विविध कार्डांचे “पिन” क्रमांक कोणासही सांगू नका, किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने उघड करू नका.

केवळ विश्वासार्ह व खात्रीच्या व्यापा-यांकडेच खरेदी, किंवा अन्य आर्थिक व्यवहार करा.

तुम्ही ए.टी.एम. मध्ये कोणताही व्यवहार करत असताना कोणी त्रयस्थ व्यक्ती तुमच्यावर लक्ष ठेऊन तर नाही ना, किंवा तुमच्यावर पाळत ठेवून तर नाही ना, याकडे लक्ष द्या आणि तशी खात्री करूनच व्यवहार करा.

**राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT), यशदा, पुणे - ४११ ००७. सर्व हक्क स्वाधीन.**